International Journal of Engineering, Management and Humanities (IJEMH)
Volume 6, Issue 6, Nov.-Dec., 2025 pp: 133-141 ISSN: 2584-2145 www.ijemh.com

# भारत-अफगाणिस्तान संबंध: संधी आणि आव्हाने

प्रा. डॉ. आनंद शिंदे

*सहयोगी प्राध्यापक, लोकप्रशासन विभाग*

*कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय हणेगांव जि नांदेड, महाराष्ट्र, भारत*

Date of Submission: 01-12-2025 Date of Acceptance: 10-12-2025

**सारांश:** भारताचे अफगाणिस्तानशी संबंध हे फार जुने असले तरी अलिकडील मैत्रीपूर्ण संबंध हे एका अपरिहार्य गरजेतून आकार घेताना दिसतात . भारताप्रमाणेच अफगाणिस्तानात शांताता आणि स्थैर्य निर्माण होऊन तेथील परिस्थिती सामान्य असावी असे भारताला वाटते . अर्थात भारत हा शांतताप्रिय, लोकशाही प्रजासत्ताक , धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे आणि स्वातंत्र्यानंतर भारताने प्रत्येक राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाचा आदर करत अलिप्ततावादी चळवळीचे समर्थ नेतृत्व केले आहे . भारताने अफगाणिस्तानाशी संबंध मजबूत करताना तेथील लोक, धर्म, विचार पद्धती यांचा आदर केलेला आहे. दूर्दैवाने अफगाणिस्तान हा नेहमी महासत्तांच्या राजकारण्यांचा बळी ठरला आणि सतत संघर्ष , युद्ध आणि यादवी अशा गर्तेत अडकला . अफगाणिस्तानात सत्ता कोणतीही असली तर भारताने उदारमतवादी व मानवतावादी दृष्टिकोनातून अफगाणिस्तानची मदत केली आहे . अर्थात या मदती पाठीमा गचा निहीत स्वार्थ हाच होता की , सीमेपलिकडून होत असलेल्या दहशतवादी कारवाया नियंत्रित करणे व शेजारी असलेल्या अफगाणिस्तानात शांतता आणि स्थैर्य राहीले ; तर भारतातही उपद्रव राहणार नाही . भारत-पाकिस्तान कटू संबंधांच्या पार्श्वभूमीवर अफगाणिस्तान हा भारताचा क्षेत्रीय भागीदार राहीला तर , विकासाचा फायदा हा उभय देशांना होईल . अफगाणिस्तानाच्या माध्यमातून भारताचा सरळ संबंध इराण आणि मध्य पूर्व राष्ट्रांशी प्रस्थापित होईल हा व्यापक दृष्टिकोन भारताचा राहिलेला आहे . अर्थात या प्रक्रियेतील मुख्य अडसर हा पाकिस्तान आणि चीन यांच्या हि तसंबंधाचा असेल . दक्षिण आशियामध्ये चीनचा कोणीही स्पर्धक असू नये अशी चीनची दीर्घकालीन महत्वकांक्षा राहीलेली आहे. चीनच्या या धोरणात्मक विचारसरणीला त्याचा उपकृत देश असलेल्या पाकिस्तानची मदत राहीली आहे . तथापि ही आव्हाने भारताला मोडीत काढून भारताचे अफगाणिस्ताशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करणे आणि विकास प्रक्रियेत अफगाणिस्तानाला धोरणात्मक भागीदार म्हणून सिध्द करण्याचे आव्हान भारतापुढे आहे . क्षेत्रीय सत्ता संतुलन , दहशतवादी कारवायांना तोंड देणे , दक्षिण आशियाई राष्ट्रांत भारताची जी विश्वासू प्रतिमा आहे ती कायम राख णे व क्षेत्रीय सहकार्य प्रक्रिया वाढीस लावणे ही आव्हाने भारतापुढे आहेत.

**बीज संज्ञा:-** सत्ता संतुलन, सार्वभौमत्व, कट्टरपंथी, बफर स्टेट, हार्ट ऑफ एशिया

**प्रस्तावना:** भारताचा अफगाणिस्तानशी ऐतिहासिक संबंध हा सिंधू संस्कृतीपासूनचा सांगितला जातो . वैदिक युगाचा वि चार करता त्याकाळी अफगाणिस्तानचा भाग असलेले गांधार (आजचे कंदाहार) हे वैदिक भारतातील 16 महाजनपदांपैकी एक मानले जात असे . महाभारतातही गांधार राज्याचा उल्लेख येतो . प्राचीन आणि मध्ययुगीन काळात गजनी , घोरी, मोघल आदी आक्रमणे ही याच मध्यपूर्वेतील भागातून झाली . ब्रिटीश भारतातील त्याकाळच्या सिंध-पंजाब प्रांतातील खैबर पखतुनखॉ प्रांताच्या सीमेलगत अफगाणिस्तान होता. अफगाणिस्तानाला ब्रिटीश भारतात विलीन करण्याच्या उद्देशाने ब्रिटीशांनी अँग्लो इंडीयन नावाचे

तीन युद्ध केली . परंतु अफगाणिस्तानची भौगोलिक स्थिती, तेथील आदीवासी ज मातीचे छुपे हल्ले यामुळे अफगाणिस्तानवर राज्य करणे त्यांना सोपे वाटले नाही . ब्रिटीश भारतावर रशियासारख्या देशापासून संभाव्य आक्रमणाचा धोका टाळण्यासाठी ब्रिटिशांनी अफगाणिस्तानला बफर स्टेट प्रमाणे ठेवले आणि डूयरँड लाईनने तत्कालीन भारत आणि अफगाणिस्तानची सीमारेषा आखली गेली.

## I. विषय ओळख

दुसऱ्या महायुद्धानंतर इतर आशियाई राष्ट्राप्रमाणे अफगानिस्तानातही स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले. तेथेही उदारमतवादी विचारधारा जोर धरू लागली. आधुनिक पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रसार या ठिकाणी होत होता. जहीर शहाच्या राजवटीत कला, साहित्य, विज्ञान, चित्रपट, संगीत आदी क्षेत्रात प्रगती होऊ लागली होती . परंतु अल्पावधीतच तेथे कट्टरपंथीयांचा प्रभाव वाढून अफगाणिस्तान मुलतत्ववादाकडे पोहचला. पुढे भारत अफगाणिस्तान संबंध दुरावले गेले . शीत युद्ध काळात सोव्हिएत रशिया आणि अमेरिकेच्या सत्तासंघर्षात अफगाणिस्तान भरडला गेला . 2001 मध्ये 9/11 च्या हल्ल्यानंतर अमेरिका अफगाणिस्तान तब्बल 20 वर्ष तळ ठोकून होता . ओसामा बीन लादेन आणि अलकयदा संघटनेला नेस्तनाबूत करण्यासाठी नाटो सैनिकासह अमेरिका पूर्ण शक्तीनिशी अफगाणिस्तानात उतरला . या काळात अफगाणिस्तान पूर्ण बेचिराक झाला. अखेरीस 2021 साली अमेरिकेने अफगानिस्तान सोडण्याचा निर्णय घेतला. कुठल्याही तीव्र प्रतिकाराशिवाय तालीबान्यांना अफगाणिस्तान पुन्हा प्राप्त झाला . अफगाणिस्तानात अमेरिकेच्या पुढाकारातून सत्तेत आलेल्या हमीद करझाई आणि अशरफ गनी यांच्या राजवटीत भारत सरकारने अफगाणि स्तानातील पायाभूत सुविधा उभारणीत मोठा पुढाकार घेतला होता. माहमार्ग बांधणी , सिंचन सुविधा , तलाव उभारणी, उर्जा प्रकल्पांची निर्मिती, शाळा व शिक्षण संस्था सुरू करणे अशा अनेक क्षेत्रांत भारताने मोठी गुंतवणूक केली होती . मानवतावादी दृष्टिकोनातून भारताने अनेकदा अन्न धान्याची निर्यात अफगाणिस्तानात केली होती . भूकंपावेळी अफगाणिस्तानात अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली होती अशा परिस्थितीत भारताने शेकडो ट्रक अन्नधान्य व औषधी पाठवलेली होती . त्यामुळे कट्टरपंथी तालिबानी सरकार सत्तेवर आल्यानंतरही तेथील जनमानसात भारताची प्रतिमा चांगली राहीलेली आहे. शिवाय तालीबानी सरकारमधील एक मोठा गट भारताच्या या निस्वार्थी सेवेमुळे भारताशी मैत्री करु पाहत होता. तब्बल दोन दशकं अमेरिकन सैन्याशी तालीबानी लढत असताना पाकिस्तानची भूमिका संशयास्पद तर भारताची भूमिका तटस्थ होती; त्यामुळे पाकिस्तानापेक्षा भारत अफगाणिस्तानला जवळचा वाटत होता . त्यामुळे कश्मिर प्रश्नावर तालीबानी सरकारने पाकिस्तानची बाजू घेतलेली नाही . अमेरिकेच्या माघारानंतर अफगाणिस्तान निर्माण झालेल्या पोकळी मुळे जगभरातील देश मुख्यत्वे अफगानिस्तानच्या शेजारी राष्ट्रांनी कोणती भूमिका घ्यावी ? सत्तेत आलेल्या तालीबानी सरकारशी राजनैतिक संबंध कसे ठेवावेत या बाबतीत एक संभ्रमावस्था निर्माण झाली होती . अमेरिकन सैनिकांच्या माघारा नंतर अफगाणिस्तान हा काही राष्ट्रांना संधीच्या स्वरुपात दिसू लागला तर काही राष्ट्रांना धोका वाटू लागला . इतर कोणत्याही राष्ट्रापे क्षा भारताचे अफगाणिस्तानातील राजकीय, आर्थिक, सामारिक, व्यापारी हितसंबंध गुंतल्यामुळे भारताने सुरुवातीला सावध पवित्रा घेतला होता . आता तालीबानी सरकारला सत्तेत येऊन चार वर्षे होत आहेत . दरम्यानच्या काळात भारत अफगाणिस्तान संबंध दृढ होण्याच्या दृष्टीने अनेक घटना घडामोडी घडून गेल्या . नुकतेच अफगानिस्तानचे परराष्ट्र मंत्री अमिर खान मुतकी हे भारत दौऱ्यावर येऊन गेले . परस्पर सहकार्य आणि भागीदारीसाठी दोन्ही देशांनी सहमती दर्शवली आहे. त्यांचा भारत दौरा अनेक दृष्टींनी महत्त्वाचा मानला जात आहे . तालीबान सत्तेत आल्यानंतर

विद्यमान अफगान सरकारचा हा पहिला भारत दौरा आहे. यापूर्वी भारताच्या परराष्ट्र खात्याने सचिव मिस्त्री यांनी कतारच्या दोहामध्ये अफगान मंत्र्यांची भेट घेतली होती. दोन्ही देशातील संबंध अधिक दृढ होण्याच्या दृष्टीने भारताचे परराष्ट्र मंत्रालय प्रयत्नशील आहे . वर्तमान जागतिक बदलत्या परिस्थितीत भारताला अफगाणिस्तानात क़ोणत्या संधी आहेत . भारत अफगानिस्तान संबंधांचे आजच्या परिप्रेक्षात काय महत्त्व आहे तथा या संबंधाच्या निमित्ताने कोणती अडथळे येऊ शकतात याचा अभ्यास या शोध लेखात करण्याचे प्रयोजन आहे.

## II. भारत-अफगाण संबंधांची ऐतिहासिक पार्श्वभूमी

दक्षिण आशियाई इतर कोणत्याही देशांपेक्षा भारतीय ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अवशेष हे अफगाणिस्तानात पहावयास मिळतात . बामियानची विशाल बुद्ध मुर्ती , तत्कालीन मंदिरांचे अवशेष , कनिष्क आणि कुषाण सम्राटांची आजही तेथे सापडणार्या नाणी भारत आणि अफगा णिस्तानातील सांस्कृतिक समरुपता दर्शवितात ; नव्हे भारतीय आणि अफगाणी लोकांचे पूर्वज एकच होते हे सिद्ध करतात. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी आपल्या अफगानिस्तान दौऱ्यात भारतीय आणि अफगाणी लोकांचे पूर्वज एकच होते त्यामुळे दोघांची संस्कृती एकच असून अफगाणी लोकांनी केवळ आपली उपासना पध्दती बदलली आहे असा उच्चार केला होता . तात्पर्य भारत आणि अफगाणिस्तानातील या समरुपतेमुळे ऐतिहासिकदृष्ट्या दोन्ही देशांतील संबंध हे दीर्घकालीन राहीलेले आहेत . अर्थात ते कधी खुप चांगल्या पद्धतीचे तर कधी साधारण स्वरुपाचे राहीले परंतू फा र टोकाचे अथवा वितुष्टाच्या स्वरुपाचे राहीलेले नाहीत. कंदाहार विमान अपहरणाच्या वेळी तालिबानाच्या संशयित भूमिकेमुळे भारताने अफगाणिस्तान बाबत सावध भूमिका घेतलेली होती. स्वातंत्र्यानंतर भारताने आपली अलिप्ततावादी परराष्ट्र नीती निर्धारित करीत असताना शेजारी राष्ट्रांशी सौहार्दाचे संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला . परंतु अफगाणिस्तान मात्र दोन महाशक्तीच्या मध्ये प्यादा बनून राहीला . अफगाणिस्तानची भूराजकीय स्थिती ही लँडलॉक असल्यामुळे मध्य आशियातील हस्तक्षेपासाठी अमेरिका आणि रशिया या दोन्ही देशांच्या राजकीय महात्वाकांक्षे मध्ये अफगाणिस्तान होरपळला गेला आहे . वर्तमान परिस्थितीत भारत आणि अफगाणिस्थान उभय देशांना परस्पर हितासाठी भविष्यात सयुंक्तपणे काम करण्यासाठी भरपूर वाव असून त्यासाठी आडथळे दूर करून अनेक क्षेत्रात सहभागीदारीची आवश्यकता आहे.

## III. उदिष्टये

1. भारत अफगाणिस्तान संबंधां चा ऐतिहासिक आढावा घेणे.
2. भारत अफगाणिस्तान द्विपक्षीय संबंधातील अडथळे अभ्यासणे
3. भारत अफगाणिस्तान संबंधांचा दक्षिण आशियाई राजकारणावरील परिणामांचा अंदाज घेणे.
4. भारत अफगाणिस्तान संबंधांचे फायदे आणि तोटे अभ्यासणे

## IV. गृहितके

1. अफगाणिस्तानशी द्विपक्षीय संबंध प्रस्थापित करणे भारतासाठी आंतरराष्ट्रीय राजकारणाची अपरिहार्यता आहे.
2. अफगाणिस्तान संबंधांमुळे भारत भारतीय उपखंडातील चीनच्या वाढत्या प्रभावाला शह देऊ शकतो.
3. भारत अफगाणिस्तान संबंधांमुळे पाकिस्तान पुरुस्कृत दहशतवादाला नियंत्रित करता येते.
4. भारत अफगाणिस्तान संबं धांमुळे भारताचा मध्यपूर्वेशी व्यापार वाढू शकतो.

## V. तथ्य संकलन आणि संशोधन पद्धती

प्रस्तुत शोध लेखासाठी मुख्यत्वे तथ्य संकलनाच्या द्वितीयक स्त्रोतातील साधनांचा वापर करण्यात आला आहे . या विषयावर लिखित संदर्भ ग्रंथ, नियतकालिकातील लेख , इलेक्ट्रॉनिक्स आणि मिडीयातून प्रसारित बातम्या तसेच भारत अफगाणिस्तान संबंधांवर भाष्य करणार्याच अधिकृत वेबसाईटवरील माहितींचा आधार घेण्यात आला आहे. सदरील लेखासाठी वर्णनात्मक , अन्वेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला असून सदरील अभ्यासांती प्राप्त निष्कर्षाच्या आधारे शिफारशी स्वरुपात काही मुद्द्यांचे विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे त्यामुळे विषय अनुषंगाने निदानात्मक संशोधन आराखड्याचा वापर करण्यात आलेला आहे.

**भारत अफगाणिस्तान संबंधांचे महत्त्व :**

**1. प्रादेशिक शक्ती संतुलन:**

दक्षिण आशियामध्ये भारताची मुख्य स्पर्धा ही चीनशी राहीलेली आहे. दक्षिण आशियामध्ये चीनचा प्रभाव रोखण्यासाठी भारताचे अफगाणिस्तानाशी चांगले संबंध राहणे भारताच्या दृष्टीने महत्वाचे आहे . शेख हसिना यांच्या सत्तापालटानंतर बांगलादेशात सत्तेत आलेल्या कट्टरपंथीयांचे धोरण आणि इतिहासाचा विचार करता पाकिस्तान या दोघांशीही भार ताचे संबंध सुधारतील यांची शक्यता दिसत नाही . शिवाय पाकिस्तानातून होत असलेल्या राज्य प्रायोजित दहशतवादाशी सामना करण्यासाठी अफगाणिस्तानाचा चांगला उपयोग होऊ शकतो . मागील चार -पाच वर्षांत भारताला यामध्ये यशही आलेले दिसते . अफगाणिस्तानाच्या माध्यमातून भारत आपली नजर मध्य आशियाई राष्ट्रांवर ठेऊ शकतो . चीनने सीपेकच्या माध्यमातून भारताच्या शेजारी पाकिस्तानातून निर्माण केलेले आव्हान लक्षात घेता अफगाणिस्तानातील भारताची उपस्थिती अत्यंत महत्वाची आहे . भारताच्या सुरक्षेला धोका निर्माण होईल अशा पाकिस्तानातील कट्टरपंथी व आतंकवादी गटाचा अफगाणिस्तानातील कट्टरपंथी समुहाशी हातमिळवणी होणार नाही याची खबरदारी भारताच्या सुरक्षा यंत्रणांनी घेतली आहे . उलटपक्षी पाकिस्तानातील अफगान सीमेकडून चालू असलेल्या तेहरिके तालीबान पाकिस्तान या आंदोलनाला भारताने समर्थन देऊन अफगाणिस्तानाची मदत करणे गरजेचे ठरते.

**2. धोरणात्मक स्थान:**

अफगाणिस्तानाचे धोरणात्मक स्थान भारतासाठी अत्यंत महत्वपूर्ण आहे कारण मध्य आशिया, दक्षिण आशिया आणि मध्यपूर्व यांच्यातील तो एक महत्वपूर्ण दूवा आहे . भौगोलिकदृष्ट्या चीन, इराण, पाकिस्तान, ताजिकिस्तान, तुर्कमेनिस्तान आणि उझबेकिस्तान या देशांच्या सीमा अफगाणिस्तानाशी लगत असल्याने त्याचे हे स्थान भारतासाठी विशेषतः महत्त्वपूर्ण आहे . मध्य आशियाशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी भारतासाठी एक पूल म्हणून अफगाणिस्तानचा उपयोग होतो.

**3. सुरक्षेच्या दृष्टीने:**

अंशीच्या दशकानंतर अफगाणिस्तान जागतिक दहशतवादाचा प्रमुख स्त्रोत राहीलेला आहे . येथील कट्टरपंथी तालिबानी गटाचा वापर पाकिस्तान भारताच्या विरोधात करण्याचा अनेकदा प्रयत्न केलेला आहे आणि भविष्यातही पाकिस्तानचा तसा प्रयत्न राहणार आहे . अशा परिस्थितीत अफगाणिस्तानात शांतता आणि स्थैर्य सुनिश्चित करण्यात भारताचा निहित स्वार्थ आहे . भारताची अफगाणिस्तानाशी प्रत्यक्ष सीमा लागून नसली तरी कश्मिरमधील शांतता भंग करण्यासाठी पाकिस्तान सर्वोतोपरी प्रयत्नशील राहीलेला आहे. परंतु भारताने आजवर आपल्या सॉफ्ट पावरने पाकिस्तानाचे हे प्रयत्न हाणून पाडलेले आहेत . भारताच्या सुरक्षेच्या दृष्टीने अफगाणिस्तानातील स्थैर्य आणि शांतता महत्त्वपूर्ण ठरणार आहे आणि भारताने हे लक्ष्य आजवर अफगाणिस्तानाची अनेक बाबतीत मदत करुन पूर्ण केले आहे.

**4. ऊर्जा आणि संसाधने:**

अफगाणिस्तानमध्ये तेल , नैसर्गिक वायू आणि खनिजे यांसारखी मुबलक नैसर्गिक संसाधने आहेत आणि भारताकडे या क्षेत्रांमध्ये परस्पर फायदेशीर सहकार्याची क्षमता आहे . भारताकडे असलेले कुशल मनुष्यबळ आणि तंत्रज्ञान याचा वापर करून दोन्ही देशांना याचा फायदा होऊ शकतो. संसाधनांबाबत चीनशी असलेली स्पर्धा आणि पाकिस्तानी प्रभावाचा सामना करण्यासाठी अफगाणिस्तानात भारताचे अस्तित्व उपयुक्त ठरते . अफगाणिस्तानातील नैसर्गिक संसाधने , तेल वायू यांचा भारत चांगल्या प्रकारे विनियोग करुन भारत आणि अफगाणिस्तान दोघांच्याही विकासाला मदत होऊ शकते. भारताचा आजपर्यंतचा अनुभव लक्षात घेता तालीबान सरकार भारताला तेथील नैसर्गिक संसाधने व साधनसंपत्तीचा उभय देशांच्या विकासासाठी वापर करण्याची परवानगी देण्याची शक्यता आहे. तालीबान सरकार सत्तेत आल्यानंतर भारत सरकारद्वारे पूर्ण झालेली प्रकल्प आणि चालू असलेल्या प्रक ल्पांची देखभाल करण्याची विनंती भारताकडे केलेली आहे . भारतीय उपखंडात चीनने पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका आदी देशांमध्ये आपले बस्तान बसवले आहे . तेथील संसाधनांचा वापर करण्यासाठी चीनने या देशांना मोठ्या प्रमाणात कर्जे दिलेली आहेत . अशा परिस्थितीत अफगाणिस्तानातील भारताची या क्षेत्रातील गुंतवणूक उभय देशांच्या फायद्याची ठरणार आहे.

**5. सांस्कृतिक संबंध:**

भारत आणि अफगाणिस्ताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा दोन्ही देशांतील संबंध दृढ करु शकतात. मागील दोन दशकांत या दृष्टीने खूप प्रयत्न झालेले आहेत . शिक्षण, आरोग्य, खेळ या बाबतीत दोन्ही देशांतील वाढलेली भागीदारी परस्पर विश्वास निर्माण करतात . भारताने अफगाणिस्तानातील क्रिकेट आणि खेळाडूंना प्रोत्साहन दिले आहे . भारतातील क्रिकेट मैदाने अफगाणी खेळाडूंसाठी विनामूल्य उपलब्ध करून दिले आहेत . अनेक प्रकारचे प्रशिक्षण अफगाणी विद्यार्थींना देण्यात येत आहे. 2023 पर्यंत, इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्स (ICCR) सारख्या विविध संस्थांकडून शिष्यवृत्ती मिळाल्याने सुमारे 14000 अफगाण विद्यार्थी भारतात शिक्षण घेत होते. 2011 पासून, दरवर्षी सुमारे 700 अफगाण भारतात राष्ट्रीय संरक्षण अकादमी, भारतीय लष्करी अकादमी सारख्या संस्थांमध्ये प्रशिक्षण घेतात . दोन्ही देशांतील नागरिकांना येण्याजाण्यासाठी विविध सुविधा देऊन दोन्ही देशांतील नागरिकांमध्ये परस्पर विश्वास वृध्दिंगत केलेला आहे.

**6. प्रादेशिक सहकार्य:**

भारत शांतता, स्थिरता आणि विकासासाठी अफगाणिस्तानच्या प्रयत्नांना पाठिंबा देण्यास वचनबद्ध राहीलेला आहे . भारताने अफगाणिस्तानातील लोकशाही समृद्ध होण्याच्या भावनेतून तेथे विशाल अशी संसद भवन इमारत बांधली. भारत अफगाणिस्तानाच्या मैत्रीचे प्रतिक म्हणून ओळखले जाणारे सलमा धरण तेथील लोकांमध्ये भारताविषयी कृतज्ञतेची भाव ना निर्माण करते. हरी नदी विकास प्रकल्प , हार्ट प्रांत ते काबूलला जाणारी ट्रान्समिशन लाईन्स ही दोन्ही देशांतील मैत्रीचे संबंध घट्ट करतात . मानवतावादी दृष्टिकोनातून भारताने अफगाणिस्तानात शिक्षण , आरोग्य इत्यादी क्षेत्रात लक्षणीय गुंतवणूक केली आहे. 2005 मध्ये, भारताने दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटनेत (सार्क) अफगाणिस्तानचे सदस्यत्व प्रस्तावित केले होते . अफगाणिस्थानच्या मदतीसाठी भारताच्या पुढाकारातून हार्ट ऑफ आशिया अभियान राबवले गेले . अफगाणिस्तान आणि त्याच्या शेजारी राष्ट्रांमध्ये प्रादेशिक भागीदारी वाढविण्यासाठी हे व्यासपीठ स्थापन करण्यात आले आहे होते . हार्ट ऑफ एशियाच्या माध्यमातून भारताने 14 सहभागी देश, 17 समर्थक देश आणि 12 प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय संघटना या अभियानात समाविष्ट केल्या होत्या. डिसेंबर 2016 मध्ये अमृतसर येथे भारताने हार्ट ऑफ एशियाची

सहावी मंत्रीस्तरीय परिषद आयोजित केली होती . 2021 मध्ये अमेरिकेच्या माघारानंतर सत्तेत आलेल्या तालीबानी सरकारला प्रत्यक्ष -अप्रत्यक्ष मान्यता देणारा तथा द्विपक्षीय संबंध प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घेणारा भारत हा पहिला देश आहे.

**7. संरक्षण सहकार्य:**

अफगाणिस्तानातील शांतता आणि स्थैर्य हे जसे भारताच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे तसेच ते मध्य आशियाई राष्ट्रांच्या हिताचे आहे . आयसिस, हक्कानी नेटवर्क या सारख्या दहशतवादी संघटनांना या भागात आपले पाय रोवू न देण्यासाठी सत्तेत आलेल्या तालीबानी सरकारला जागतिक मान्यता आणि आंतरराष्ट्री य सहकार्य मिळवून देण्याचा भारताचा जो प्रयत्न आहे तो व्यापक हिताचा आहे . तालीबानकडे प्रशिक्षित सैन्य, युद्ध तंत्रज्ञान व शस्त्र-अस्त्रांचा अभाव असल्यामुळे भविष्यात पुन्हा परकीय हस्तक्षेप अथवा यादवीचा धोका आहे . त्यामुळे अफगाणिस्तानला स्वतःची संरक्षण सिद्धता उभे करणे गरजेचे आहे . याच दृष्टिकोनातून भारताने 2015 आणि 2016 मध्ये अफगाणिस्तानला रशियाने बनवलेले तीन Mi-25 हेलिकॉप्टर दिले होते . सत्तेत आलेल्या तालीबानी सरकारने जर वचनबध्दता दर्शवली तर भारत येणाऱ्या काळात अफगाणिस्तानाच्या सुरक्षेच्या दृष्टीने संरक्षण क्षेत्रात गुंतवणूक करु शकतो.

**8. मध्य आशियाचे प्रवेशद्वार:**

भारतासाठी अफगाणिस्तान हा मध्य आशियातील प्रवेशद्वार आहे . दहशतवाद आणि सीमेवरील तणाव तसेच अलिकडील दोन्ही देशांतील संघर्षामुळे भारताचा पाकिस्तानमार्गे मध्य आशियातील प्रवेश बंद झालेला आहे . पाकिस्तानपुरुस्कृत दहशतवाद , सैन्याचे शासन आणि प्रशासनावरील वर्चस्व यामुळे भारत पाकिस्तान संबंध सुधारतील यांची शक्यता नजिकच्या काळात दिसून येत नाही . अशा परिस्थितीत अफगाणिस्तान हा भारतासाठी एकमेव पर्याय राहतो . अफगाणिस्तानाच्या माध्यमातून भारताची सहज पोहच ही मध्य आशियाई राष्ट्रां शी होणार आहे . भारताने त्या दृष्टीने अफगाणिस्तानातील रस्ते , दळणवळण व वहातूक क्षेत्रात गुंतवणूक केलेली आहे . इराणमधील चाबहार बंदर विकसित करुन भारत -इराण प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित केले आहेत . जरंग ते डोलाराम राष्ट्रीय महामार्ग विकसित करुन भारतीय माल मध्यपूर्वेतील राष्ट्रांपर्यंत पोहचण्याची व्यवस्था केली आहे . तालिबानने भारताला काबूलमधील त्यांचे मिशन पुन्हा सुरू करण्यास , देशात थेट उड्डाणे पुन्हा सुरू करण्यास आणि अफगाण सैनिकांना लष्करी प्रशिक्षण देण्यास भारताकडे प्रस्तावित केले आहे . त्यामुळे भारताचा मध्य आशिया ई राष्ट्रांशी प्रत्यक्ष व्यापार संबंध प्रस्थापित होऊ शकतो.

**भारत-अफगाणिस्तान संबंधांमधील आव्हाने**

तालीबान सत्तेत आल्यानंतर दक्षिण आशियामधील सत्ता संतुलन बदलू शकते . अर्थात हा बदल काही देशांना अनुकूल तर काही देशांना प्रतिकुल वाटू शकतो . भारताच्या दृष्टीने भारत अफगाणिस्तान संबंधांमध्ये मुख्यत्वे पुढील अडथळे संभवतात.

**1. पाकिस्तानची भूमिका:**

अफगाणिस्तानातील भारताच्या वाढत्या उपस्थितीला पाकिस्तान आपल्या सुरक्षेचे कारण देऊन तथा प्रादेशिक प्रभावाचा धोका मानून अफगाणिस्तानशी संबंध दृढ करण्याच्या भारताच्या प्रयत्नांना नेहमी अडथळा आणण्याचा प्रयत्न करत आलेला आहे आणि भविष्यातही करणार हे निश्चित आहे. त्यामुळे पाकिस्तानचे हे प्रयत्न कुटनितिक पध्दतीने हानून पाडणे आवश्यक आहे . भारत आणि अफगाणिस्तानमधील दृढ होत असलेले राजकीय संबंध, वाढती भागीदारी व व्यापार वृध्दी ही पाकिस्तानसाठी पोटसूळ ठरत आहे . त्यामुळे पाकिस्तान अफगाणिस्तानात एअर स्ट्राइक करुन

तेथील शांतता भं ग करणे , भारताने उभारलेले निर्माण प्रकल्प नष्ट करणे , अफगाणिस्तानची अडवणूक करणे अशा कार्यवाहया चालू केल्या आहेत. अफगाणिस्तानातील कुनार नदीवरील प्रस्तावित धरण प्रकल्पाला पाकिस्तानचा जो विरोध आहे तो अशाच कलुषित भावनेतून आहे.

**2. दहशतवादी गट:**

अफगाणिस्तानात अ ल-कायदा सारख्या दहशतवादी गटांची सतत उपस्थिती ही भारतासाठी मोठी चिंता आहे . शिवाय जैश ए महंमद आणि लष्कर ए तयबा सारख्या दहशतवादी संघटनांशी तालीबानचा संबंध होता . अफगाणिस्तानातील कट्टरपंथी समुहाचा आयसिस सारख्या दहशतवादी संघटनांशी सख्य होणार नाही याची काळजी घ्या वी लागेल. भारत आणि अफगाणिस्तानातील दृढ होत असलेल्या संबंधांना अडथळा निर्माण करण्यासाठी पाकस्थित दहशतवादी संघटना पाकिस्तानी सैन्य आणि गुप्तहेर यंत्रणा आयएसआय हे सदैव प्रयत्नशील असतील. अफगाणिस्तानातील अलकयदा सारख्या दहशतवादी संघटनांना कश्मिरमध्ये अस्थैर्य निर्माण करण्यासाठी पाकिस्तान शस्त्रास्त्रे , पैसा आणि इतर सुविधा उपलब्ध करून देऊ शकते . भारतामध्ये दहशतवादी कारवाया करण्यासाठी दहशतवादी संघटनांना पाकिस्तान आपल्या सैन्यांमार्फत प्रशिक्षण देत असते. भारताला हक्कानी गटासारख्या दहशतवादी गटांपासून धोका आहे , जो संयुक्त राष्ट्रांनी दहशतवादी गट म्हणून घोषित केलेले आहे. हक्कानी नेटवर्क हा तालिबानचा एक प्रमुख सदस्य आहे . त्यामुळे येणाऱ्या काळात तालीबानी सरकारमध्ये या हक्कानी गटाचे किती वर्चस्व राहील यावर भारताचे अफगाणिस्तानातील भविष्य निश्चित करते.

**3. चीनचे आव्हान:-**

दक्षिण आशियामध्ये चीन हा भारताचा पारंपरिक स्पर्धक राहीलेला आहे . चीनची अफगाणिस्तानशी प्रत्यक्ष सीमा लागून आहे . अशा स्थितीत अफगाणिस्तानातील नैसर्गिक संसाधने , तेल वायू साठे यांचा वापर करण्यासाठी चीन सर्वोतोपरी प्रयत्न करणार . सीपेकच्या माध्यमातून पाकिस्तानातील ग्वा दर बंदराचा विकास चीनने केलेला आहे . चीन पाकिस्तानमार्गे पाकव्याप्त कश्मिरमधून अरबी समुद्रापर्यंत पोहचलेला आहे . सद्यस्थितीत चीनकडे अफगाणिस्तानातील खाणी व नैसर्गिक संसाधनाचा विकास करण्याचे मर्यादित अधिकार आहेत. परंतु भारताची अफगाणिस्तानातील या क्षेत्रातील भा गीदारी चीनपेक्षा अधिक आहे . शिवाय भारताची अफगाणिस्तानातील उपस्थिती ही इतर कोणत्याही राष्ट्रापेक्षा अधिक आहे . अर्थात चीनला भारताचे अफगाणिस्तानातील हे वर्चस्व मानवणारे नसणार त्यामुळे या दृष्टीने चीनच्या हलचालीवर लक्ष ठेवणे आवश्यक ठरते.

**4. आर्थिक आणि पायाभूत सुविधांमधील आव्हाने:**

आर्थिक आणि धोरणात्मक गुंतवणुकीच्या माध्यमातून गेल्या काही वर्षांत भारताने अफगाणिस्तानमधील प्रकल्पांमध्ये अंदाजे $3 अब्ज गुंतवणूक केली आहे . तालिबानच्या उदयानंतर भारताची ही गुंतवणूक आणि प्रयत्न विफल होतील याचा असूरी आनंद पाकिस्तानने घे तला तथापि दुसऱ्यांदा सत्तेवर आलेल्या तालीबान सरकारने भारताने अफगाणिस्तानमध्ये केलेल्या प्रयत्नांबाबत आभार मानले व भविष्यात दोन्ही देशांतील भागीदारीची अपेक्षा केली आहे . तेथील कट्टरतावादी गटाचा प्रभाव , सुरक्षेविषयीचे प्रश्न , भ्रष्ट्राचार या समस्या या भारताने आतापर्यंत तेथे केलेल्या पायाभूत क्षेत्रातील गुंतवणुकीत अडथळा ठरू शकतात.

**5. अंमली पदार्थांची तस्करी:**

अफगाणिस्तान हा जगातील सर्वात मोठा अफू उत्पादक देश आहे . विशेषतः या भागातील दहशतवादी संघटनांचा तो फार मोठ्या उत्पन्नाचा स्रोत आहे . अंमली पदार्थांच्या व्यापारा मुळे या

International Journal of Engineering, Management and Humanities (IJEMH)
Volume 6, Issue 6, Nov.-Dec., 2025 pp: 133-141 ISSN: 2584-2145 www.ijemh.com

प्रदेशात अस्थिरता आणि हिंसाचार वाढला आहे , ज्याचा परिणाम भारत आणि अफगाणिस्तान दोघांवरही झाला आहे . या अंमली पदार्थांच्या तस्करीचा धोका भारताला मोठ्या प्रमाणात असून उभय देशांच्या परस्पर सहकार्याने ही समस्या सोडवण्याची गरज आहे.

## VI. निष्कर्ष व समारोप

अफगाणिस्तान हा जगातील सर्वात गरीब आणि कमी विकसित देशांपैकी एक आहे . प्रशासनाचा कुठल्याही अनुभव नसलेल्या तालीबान्यांना येणाऱ्या काळात सरकार चालवण्याचे , आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित करण्याचे मोठे आव्हान असणार आहे . तालीबानची अगोदरची प्रतिमा ही कट्टरपंथी असल्या ने आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध देश कसा प्रतिसाद देतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. सद्यस्थितीत भारतीय उपखंडात चीनचा प्रभाव रोखणे , अफगाणिस्तानाच्या माध्यमातून पाकिस्तान आणि पाकिस्तान पुरुस्कृत दहशतवादी कारवाया रोखणे , मध्य आशियाई राष्ट्रांशी व्यापार वृध्दी आ णि इतर आंतरराष्ट्रीय कुटनितीसाठी अफगाणिस्तानशी तात्त्विक मतभेद असतानाही व्यावहारिक अपरिहार्यतेतून संबंध दृढ करणे ही भारतासाठी प्राथमिकता आहे . भारताने अफगाणिस्तानमध्ये गुंतवणूक वाढवली पाहिजे , विशेषतः पायाभूत सुविधा, शेती, सिंचन आणि ऊर्जा यासारख्या क्षेत्रात काम केले तर अफगाणिस्तानची अर्थव्यवस्था सुधारण्यास आणि रोजगार निर्माण करण्यास मदत होईल आणि भारताचा अफगाणिस्तानसोबतचा आर्थिक संबंध आणखी दृढ होईल. अफगाणिस्तानच्या नैसर्गिक संसाधनांमध्ये गुंतवणूकीला वाव असून या क्षेत्रातील भारताची भागीदारी अफगाणिस्तानच्या निर्या तीसाठी उपयुक्त ठरू शकते.

वास्तविक अमेरिका आणि रशिया या दोन्ही महासत्तांना अफगाणिस्तानात जे जमले नाही ते भारताने करुन दाखविले आहे . अफगाणिस्तानला महासत्तांची कबर म्हटले जाते . अंशीच्या दशकात सोव्हिएत रशिया आपल्या साम्यवादी विचारांचे सरकार तेथे बसवले परंतु ते औटघटकेचे ठरले . अमेरिका वीस वर्षे आपले लाखो सैन्य सोबत घेऊन लाखो डॉलर्स खर्च केले परंतु : अफगाणिस्तानला नमवू शकले नाही . परंतु भारताने आपल्या सॉफ्ट पावरचा वापर करुन अफगाणिस्तानला आपल्या बाजूने उभे केले . धार्मिक समानता नसताना कट्टरपंथी मुस्लिम तालीबानी सर कारला भारताचा मीत्र बनवणे खचितच सोपे नव्हते परंतु यामागेही वर्तमान विदेश नीती सोबतच मागील 75 वर्षातील भारताची आंतरराष्ट्रीय प्रतिमाही होती . भारत हा प्रजासत्ताक लोकशाही मानणारा , शांतता आणि परस्पर सहकार्य भावनेवर विश्वास ठेवणारा , स्वतः सोबतच इतरांच्या सार्वभौ मत्वाचा सन्मान राखणारा एक धर्मनिरपेक्ष देश आहे : ज्याने दुसर्या महायुध्दानंतर तिसरे महायुद्ध होणार नाही यासाठी आंतरराष्ट्रीय राजकारणाला वळण देत अलिप्ततावादी चळवळीचे नेतृत्व केले होते . भारताविषयीचा हा आंतरराष्ट्रीय विश्वास तालीबानी सरकारला वाटणे साहजिक आहे.

## VII. संदर्भ

[1]. देवळाणकर शैलेंद्र, भारताचे परराष्ट्र धोरण नवीन प्रवाह, सकाळ प्रकाशन पुणे, 2018
[2]. जैन पुखराज , राजनीति विज्ञान , साहित्य भवन पब्लिकेशन, आगरा, 2015.
[3]. राव प्रदीप सिंह , अफगाणिस्थान समस्या भारतीय विदेशनीति के संदर्भ में , प्रिंटवैल पब्लिशिंग, जयपुर, 1997.
[4]. सरोज कुमार रथ , भारत अफगानिस्तान संबंध इतिहास एव विदेश नीती के आईने में, प्रभात प्रकाशन , दिल्ली, प्रथम संस्करण 2022
[5]. https://www.esakal.com/saptarang/affect-india-afghanistan-relations-traditional-cultural-and-civil-relations-with-afghanistan-rjs00
[6]. https://maharashtratimes.com/editorial/india-afghanistan-relations-special-explained/articleshow/124944136.cms

[7]. https://sanatanprabhat.org/marathi/971429.html
[8]. https://divyamarathi.bhaskar.com/opinion/news/all-pakistans-objectives-and-strategies-have-failed-one-after-another-india-afghanistan-relations-are-causing-unease-136193697.html